*"यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"*

*इतिहासातील एक भव्य-दिव्य व्यक्तिमत्त्व*

# झाशीची राणी लक्ष्मीबाई नेवाळकर

आयत्या वेळी कच न खाणारं परिपूर्ण नेतृत्व, जाज्वल्य देशाभिमान, स्वतःच्या कर्तबगारीवर उदंड विश्वास, स्वाभिमान व स्वयंप्रेरित निर्णय घेण्याची वंशदत्त गुणवत्ता, त्याग, कार्यकुशलता, कुलीनता, अदम्य उत्साह ... अशा सर्व उच्च मानवीय गुणांचे एकत्रित दर्शन ज्या एका विलक्षण राजकीय नेतृत्वात दिसून येते त्या व्यक्तीचे नांव होते, राणी लक्ष्मीबाई - माहेरची मनकर्णिका तांबे.

जन्म १९-११-१८३५ आणि रणांगणावर लढताना आलेले वीरमरण १८ जून १८५८. केवळ बावीस वर्षे व सात महिन्यांचे आयुष्य ! थोड्याच काळाकरता आकाशात चमकून जाणाऱ्या सौदामिनीसारखं सर्व आयुष्य गेलं. आई चौथ्या वर्षी निवर्तली म्हणून, वडील श्री. मोरोपंत तांबे यांनीच सर्व काळजी घेतली. १८४२ मधे विवाह झाशीचे राजे श्री. गंगाधरराव नेवाळकर यांचेशी झाला. १८५१ मध्ये राणीने एका पुत्राला जन्म दिला; पण त्याचे आयुष्य तीनच महिन्यांचे होते. स्वतःच्याच 'कऱ्हाडा' ज्ञातीतील 'आनंद' नावाच्या मुलाला या दांपत्याने दत्तक म्हणून घेतला. त्याचे नाव 'दामोदर' ठेवले. दिनांक २१-११-१८५३ या दिवशी गंगाधररावांचे देहावसान झाले. राणी लक्ष्मीबाई अठराव्या वर्षी विधवा झाली. १८५४ च्या मार्च महिन्यात गव्हर्नर डलहौसीने दत्तकपुत्र कंपनी सरकारला मान्य नसल्याचे कळविले. झाशी संस्थान ब्रिटिशांच्या राज्याचा एक भाग म्हणून जाहीर केले. राणीला झाशीचा किल्ला सोडून झाशीतील राजवाड्यात रहायला सांगितले. वार्षिक साठ हजारांची नेमणूक करून दिली.

राणीची प्रतिक्रिया 'मी झाशी देणार नाही' अशी होती. पण आचरणात आणणे कठीण होते. दिल्लीच्या बादशहाने गुडघे टेकले होते. इतर लहान-मोठे संस्थानिक, कंत्राटी व्यवस्थापक, इस्टेट मॅनेजर्स, सर्व-सर्व खुजे ठरले होते .... आणि या सर्वांच्या मानाने झाशी हे फारच छोटे राज्य होते. शेजारच्या ग्वाल्हेरचा राजा इंग्रजांचा अनुग्रहप्रार्थी ! त्यावेळी एतद्देशीय लोकही बव्हंशी एकूण परिस्थितीशी मिळते जुळते घेणाऱ्या विचारांचे ! १७५२ इसवीमध्ये वीस चौरस मैल प्रदेशाचे मालक असलेले इंग्रज शंभर वर्षात साडेसहा लाख चौरस मैलांच्या प्रदेशावर मालकी हक्क गाजवीत होते.

राणीने पुढच्या दोन-तीन वर्षांचा काळ ध्यानधारणा - पूजाअर्चा - सर्व परिस्थितीचे आकलन करण्यात घालविला. ती तलवार बहादूर होतीच. धनुर्विद्या, पिस्तूल चालविणे, खंजीर-भाला-बर्चीचा उपयोग आणि वेगवान् घोड्यांची दमछाक होईपर्यंत रपेट करणे हा तिचा दैनंदिन कार्यक्रम होता. घोड्याचा लगाम तोंडात धरून दोन्ही हातानी तलवार चालविण्यात राणी प्रवीण होती. वैधव्य आल्यावर काशीला जाऊन, त्या वेळच्या प्रथेप्रमाणे केशवपन करावयाचे होते. परंतु काशीला जाण्याची परवानगी मिळाली नाही. त्यावेळी राणीने प्रतिज्ञा केली, "आता केशवपन स्वातंत्र्य मिळाल्यावर किंवा स्मशानात अग्नीकडून !" डोक्यावर शिरस्त्राण, त्यावर पागोटे, छातीवर चिलखत, तसेच हाता-पायांचे रक्षण आणि राणीचा शुभ्र वर्णाचा काठियावाडी घोडा ! हे त्यावेळचे राणीच्या बाबतीतले वर्णन मिळते.

नवीन परिस्थितीशी जुळवून घेण्याचे कसब न जमलेल्या काही खऱ्या-खुऱ्या राजांनी एकत्र येऊन ब्रिटिशांविरुद्ध उठाव करावयाचे ठरविले. तारीख ठरली ३१ मे १८५८. उतावीळपणे तो उठाव दहा मे या दिवशीच मीरतला झाला. मीरत व दिल्ली येथील

भारतीयांच्या सैन्यदलांतील तुकड्यांनी भारताचा बादशहा म्हणून बहादूरशहाचे नाव जाहीर केले. चार जूनला कानपूरला उठाव झाला. त्याचे पडसाद झाशीलाही उमटले. झाशी येथील ब्रिटिशांच्या एजंटाने ब्रिटिशांच्या बायकामुलांना किल्ल्यामधे रक्षण देण्याची विनंती राणीला केली. राणीने ती मानली. दरबारच्या लोकांना 'मी क्षात्र धर्माचे पालन केलेले आहे'; असे सांगितले. जून १८५७ ते मार्च १८५८ या दहा महिन्यांचे प्रशासन राणीकडे होते. ते खूपच सुधारलेले होते. सैन्यात स्त्रियांची पलटणही राणीने केलेली होती.

नवीन परिस्थितीमुळे जनरल सर ह्यूज् रोजने २३ मार्च १८५८ ला झाशीशी युद्ध पुकारले. झाशीचा किल्ला भर-भक्कम नसल्यामुळे राणी काल्पीच्या किल्ल्यात गेली. काल्पीवरून ग्वाल्हेरला. ग्वाल्हेरचा राजा जयाजी शिंदे ग्वाल्हेर सोडून आग्र्याला इंग्रजांच्या आश्रयासाठी पळाला होता. ग्वाल्हेरचे सैन्य राणीचे नेतृत्व मानतेय हे समजल्यावर ह्यूज् रोजने चलाखी केली. त्याने दवंडी पिटली; 'राजा जयाजी शिंदे यांना परत गादीवर आणण्यासाठी ब्रिटिश सैन्य मदत करीत आहे; म्हणून ग्वाल्हेरचे जे सैनिक परत येऊन मिळतील त्यांना क्षमा करण्यात येईल' ... याचा अपेक्षित परिणाम झाला. राणीला ग्वाल्हेर किल्ल्यातून निघावे लागले. ब्रिटिशांचे सैन्य पाठीवर घेऊन राणी दौडत राहिली. तिने अनेकांना कंठस्नान घातले. एकाने तिच्या पोटावर खंजीर मारला होता. मांडीला गोळी लागली होती. बाबा गंगाधर दासांच्या आश्रमात राणीला आणण्यात आले. 'हर हर महादेव' आणि 'वासुदेवः शरणं मम' हे तिचे शेवटचे शब्द होते. आश्रमाजवळच तिला अग्नी दिला.

चलाखीने विश्वासघात करण्याची विद्या नसलेले रामचंद्रराव देशमुख शरीररक्षक महंमद गुल व रघुनाथ सिंह हे शेवटपर्यंत राणीबरोबर होते. दीडशे वर्षानंतरही आज राणीचे नाव उच्चारल्याबरोबर तिच्याबद्दल आदर व आत्मीयता वाटते ती, तिचे अतुलनीय धाडस, धैर्य, अचल निष्ठा, देशप्रेम, आसामान्य करिष्मा असल्यामुळेच. तिच्यावरची असंख्य गाणी, पोवाडे, मुलांना सांगितल्या जाणाऱ्या कथा-कविता-गोष्टी, नाटकं-एकांकिका या सर्वांच्या माध्यमातून राणी आजही रसरशीत जिवंत आहे. जनरल सर ह्यूज् रोजने लिहिले - ''बंडखोरांपैकी सर्वात शूर, सर्वात श्रेष्ठ दर्जाचे सेनापतीचे व नेतृत्वाचे गुण असणारी व्यक्ती होती राणी लक्ष्मीबाई !''

जनरल ह्यूज् रोजचे हे पुढचे वाक्य पहा - **"the woman who was the only man among the rebels"** - ''अशी स्त्री की जी त्या बंडखोरांपैकी एकमेव पुरुष होती !''

हे वाक्य वाचल्यावर मला पु. ल. देशपांडे यांचे आणीबाणीच्या काळातले, मराठी साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषण करणाऱ्या, दुर्गा भागवत यांच्या त्यावेळच्या त्यांनी केलेल्या वर्णनाची आठवण झाली. देशपांडे म्हणाले होते की ''कराडच्या संमेलनात एक पुरुष तडाखेबंद, लखलखीत भाषण करीत होता. फक्त त्याने लुगडे परिधान केले होते व त्याचे नाव होते दुर्गा भागवत !'' ... दुर्गा भागवत व कमला भागवत (नंतर कमला सोहोनी) या सख्ख्या बहिणी ! कऱ्हाडा व्यक्तिमत्त्व ! कशेळी येथील प्रख्यात भागवत घराणातल्या !

दि. ३.८.१८५८ च्या टाइम्समधे ब्रिटिश वार्ताहराने सुद्धा मुक्त कंठाने राणीची स्तुती केली. झाशी डिस्ट्रिक्ट गॅझेटियरमध्येही राणीची प्रशंसा आहे.

फक्त ही प्रशंसा सहन न होणारे काही लोक महाराष्ट्रात निघाले. अत्यंत चलाखीने या लोकांनी राणीचे वर्णन असे काही केले; की त्यातून राणीचे शूर-वीराचे कार्य यःकश्चित ठरावे. त्यामधे प्रा. न. र. फाटक, श्री. व्ही. डी. दिवेकर हे आहेतच, प्रतिभा रानडेंचेही लिखाण नीट वाचण्यासारखे.

अलीकडचा याच परंपरेतला एक नमुना पहायचा तर दि.२९.३.२००७ चा पुण्याचा

'सकाळ'चा अंक पहावा. स्वातंत्र्ययुद्धाला दीडशे वर्षे पूर्ण होतात म्हणून सकाळने या उठावाचा आलेख सांगणारा एक लेख, पुणे विद्यापीठाच्या एका विद्वान प्राध्यापकाचा छापला. त्यातले हे त्यांचे वाक्य वाचा – ''झाशीच्या राणीचा पराक्रम निःसंशय महान्; पण त्यांच्या सुमारे २–३ वर्षे आधीच 'ज्ञानोदया'त विद्रोही निबंध लिहून (१८५५) समतेचा झेंडा फडकवणारी म. फुले यांच्या शाळेतील मुक्ताबाई हा मातंग विद्यार्थिनी कोणत्या अर्थाने कमी पराक्रमी म्हणता येईल ?'' ... काही चलाख परंपरा दुष्ट, मत्सरग्रस्त स्वभावामुळे जपलेल्या मंडळींचे राणीवरचे लिखाण अशा नमुन्याचे आहे. आशय असा – ''तुम्ही झाशीच्या राणीला मोठे ठरवता ? मग १८५५ साली म. फुलेंच्या शाळेतल्या मुलीने विद्रोही निबंध लिहिला ती कमी पराक्रमी म्हणायची?'' ... युनिव्हर्सिटी प्रोफेसर डॉ. राजा दीक्षित एका प्रसिद्ध दैनिकामध्ये अशा प्रकारचा लेख लिहू शकतो. तुलना करण्यासाठी साम्याचे घटक एवढे पुरत असतील तर कसा हाहाःकार उडवून देता येतो; याचा अस्सल नमुना आहे हा ! मातंग मुलीने ज्ञानोदयात लिहिलेला विद्रोही निबंध आणि त्यानंतर तीन वर्षांनी झाशीच्या राणीचा पराक्रम यात पहिला नंबर कोणाचा ? असा सवाल या प्रोफेसर महाशयांचा आहे. सरकार दरबारची प्रसिद्धी अशा लिखाणानेच खात्रीने मिळत असते. त्यात कोणत्या समाजगटात, केवढे फायदे, कशा तऱ्हेने मिळवता येतात ? याचा थोडा विचार केलात की अशा लिखाणाचे मूल्य समाजात, सरकारदरबारी विशिष्ट चलाख लोकांच्या समाजात केवढेऽऽऽ असते ? या गोष्टी ढळढळीतपणे प्रसिद्ध होतात; त्याचे लेखक ख्यातनाम विद्यापीठात गुरु-पदी विराजमान असतात.

ही चलाखी, ही तथाकथित बुद्धिमत्ता आमचेजवळ नाही हे आमचे सुदैव !!

अशासारख्याच एका व्यक्तीने राणी लक्ष्मीबाईवर नुसते पुस्तक लिहिल्याचे ऐकून आमचा एक संघ त्यांना आठ-दहा हजार रु. खर्च करून भाषणाला बोलावित होता. पुस्तकही वाचले नाही. हा भाबडेपणा आपणाजवळ नको. निदान अशी चलाखी समजण्याइतपत तरी आपण दक्ष राहू या !

ब्राह्मणांची एकी करण्याची माळ एकीकडे ओढायची असते आणि गुणवान् संततीला इतिहास काळापासून सतत जन्माला घालून सर्वांपुढे गुणांमुळे जाणाऱ्यांना किंवा त्यांच्या समाजाला असे खाली ओढत रहायचेच असते. चलाखी अशी की राणी लक्ष्मीबाईला दुय्यम लेखल्याबद्दल, अशीच मानसिकता जोपासणाऱ्यांकडून शाबासकी मिळवायची आणि याविरुद्ध कोणी लिहिलं तर 'मी मातंगी मुलीबद्दल तसे लिहिल्यामुळे याला राग आला. हा जातीयवादी आहे हे ठरवता यावे' शाब्बास प्रोफेसर !!

याचा काहीही परिणाम होत नाही ही गोष्ट वेगळी ! अशांना उत्तर देण्याचीही गरज नसते. पण दखल घेणारी माणसे आहेत एवढे कळविणे गरजेचे असते. परिणाम एकच; परंपरागत चालू असलेली मानसिकता कळते !

दुर्जनांचा कर्दनकाळ, महाकाली दुर्गा-स्वरुपिणी राणी लक्ष्मीबाई तुम्हाला शत शत प्रणाम !

१) अधिक माहितीसाठी पहा
www-thekarhaadaa.org

२) पुढील नमस्काराई व्यक्ती
**पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर**

**अवधूत हर्डीकर**
१६ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११०३८